**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, २०१६) नुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सूचना.**

# महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन शुद्धिपत्र क्रमांकः अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६**
**गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,**
**मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई**
**दिनांक: ०९ सप्टेंबर, २०२४.**

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४.०९.२०१८
२) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई येथे दाखल O.A. ४८३/२०२४ मध्ये दि.२५.०७.२०२४ रोजी झालेल्या निर्णय.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनिनियम, २०१६ (The Rights of Persons with Disability Act, २०१६) नुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे राज्यातील शासकीय रुग्णालये, शासकीय व महानगरपालिकांची वैद्यकीय महाविद्यालये व महानगरपालिकांची इतर रुग्णालये येथे दिव्यांगत्वाचे मूल्यमापन व दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र वितरणासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मुळ अर्ज क्र. ४८३/२०२४ मध्ये दि.२५.०७.२०२४ रोजी झालेल्या निर्णयात, केंद्र शासनाच्या "दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६" मधील कलम- ५९ मधील अपिलाबाबतच्या तरतुदी व उपरोक्त दि.१४.०९.२०१८ च्या शासन निर्णयामधील तक्रार, अपील इत्यादी तरतुदींमध्ये विसंगती असल्याचे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. १ येथील दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**शुद्धिपत्र :**

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथे नमूद शासन निर्णयातील ग) तक्रार, अपिल व निर्देशी मंडळ या शिर्षकाखालील १) येथे नमूद

**"एखादया व्यक्तीचे प्रमाणपत्राच्या स्वरुपावरुन किंवा त्याला पाहिजे तसे प्रमाणपत्र न मिळाल्यास, त्याला** विभागीय उपसंचालक, आरोग्य सेवा (परिमंडळे) किंवा अधिष्ठाता, जे. जे. समुह रुग्णालय, मुंबई किंवा केंद्रीय संस्था प्रमुख यापैकी संबंधित अपिलीय मंडळाकडे अपिल करण्याची मुभा राहील."

या ऐवजी

**“वरील अ) ते इ) येथील पद्धतीचा अवलंब करुन वितरीत केलेल्या प्रमाणपत्राने व्यथित कोणत्याही व्यक्तीस सदर प्रमाणत्राविरुद्ध** विभागीय उपसंचालक, आरोग्य सेवा (परिमंडळे) किंवा अधिष्ठाता, जे. जे. समुह रुग्णालय, मुंबई किंवा केंद्रीय संस्था प्रमुख यापैकी संबंधित अपिलीय मंडळाकडे अपिल करण्याची मुभा राहील”. असे वाचावे.

२. संदर्भ क्र. १ येथे नमूद दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयातील इतर तरतुदी पुर्वीप्रमाणे कायम राहतील.

३. सदर शासन शुद्धिपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२४०९०९१५३१४७७४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEELAM GIRISH SANGWAI

Digitally signed by NEELAM GIRISH SANGWAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=a9bbc429d62201a67249f70e60acdfadbff901fbbbf45cc393dbd6aa91fbd6ca, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=81e4e52421d72a2ae32df6c7d06abb4e6a7b5820c3a929f328ad6c0dca4f38c7, cn=NEELAM GIRISH SANGWAI
Date: 2024.09.07 00:00:20 +05'30'

**(नीलम संगवई)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) उपमुख्यमंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६) मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा. मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व विधानमंडळ सदस्य (विधानपरिषद/विधानसभा), विधान भवन, मुंबई
११) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-०१
१३) सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-०१
१४) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-०१
१५) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मित्तल टॉवर, मुंबई
१७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१८) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई

१९) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
२०) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई
२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२२) आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२३) विभागीय आयुक्त (सर्व)
२४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
२५) आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे
२६) आयुक्त, महानगरपालीका (सर्व)
२७) जिल्हाधिकारी (सर्व)
२८) संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
२९) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
३०) जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
३१) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
३२) जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
३३) सहसंचालक/उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
३४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये (सर्व)
३५) अधिष्ठाता, वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (सर्व संबंधित रुग्णालये)
३६) वैद्यकीय अधिक्षक,ग्रामीण रूग्णालय,उपजिल्हा रूग्णालये (सर्व)
३७) संस्थाप्रमुख, ऑल इंडीया इन्स्टिटयुट ऑफ फिजिकल मेडिसिन ॲन्ड रिहॅबिलीटेशन हाजी अली,मुंबई
३८) संस्था प्रमुख, अलीयावर जंग नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ स्पीच ॲन्ड हिअरींग डिसॲबिलिटिज (दिव्यांगजन), बांद्रा,मुंबई
३९) सह सचिव / उप सचिव/ सर्व कार्यासने, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
40) निवड नस्ती (आरोग्य-६)